# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/१०/२०२४ (बुधवार) सायंकाळ**

---

## अवैधरेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

## वाहनासह एकुण २०४८०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक २२/१०/२०२४रोजी पोलीस स्टेशन नरखेड येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की,पांढुर्णा ते मोहदी दळवी मार्गे नरखेड एक १२ चक्का टिप्पर वाहनाचा चालक हा टिप्पर वाहनातअवैधरित्या विनापरवाना रेती (वाळू) वाहनामध्ये लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून मोहदी दळवी गावाजवळ रोडवर एक १२ चक्का टिप्पर वाहन क्र. एम.एच—३१/एफ सी—१२१२ हा समोरून येतांनी दिसला. टिप्परला थांबवुन टिप्पर चालकास टिप्परमध्ये काय आहे असे विचारले असता चालकाने टिप्परमध्ये रेती असल्याचे सांगितले.चालकास रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितले. टिप्पर चा चालकाने विनापरवाना अवैध्यरित्या रेती वाहतुक करतांना मिळुन आल्याने टिप्पर मधील ०८ ब्रास रेती किंमती ४०,०००/—रू. व १२ चक्का टिप्पर वाहन क्र. एम.एच—३१/एफ सी— १२१२ किंमती २०,००,०००/—रू. टेक्नो स्पार्क कंपनीचा मोबाईल किंमती ८०००/—रू.असा एकुण २०४८०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करून टिप्पर वाहन क्र. एम.एच—३१/एफ सी— १२१२**चा चालक आरोपी नामे—सोनु शैतानसिंग हिंगवे, वय ३२ वर्ष, रा. जुनेवानी ता. जिल्हा पांढुर्णा एम.पी वाहक नामे—अमिरचंद नेंदलाल जथरे, वय २४ वर्ष, रा. मानिकवाडा ता. नरखेड** यांचेविरुद्ध पोस्टे नरखेड येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं. सक. ४८(८), ४८(७) म. ज. अधि सक. ४, २१खान खनिज अधि. सहकलम ३ सार्व स. नुक अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी अटक आहेत.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल श्री.बापू रोहोम यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे नरखेड येथील ठाणेदार सपोनि अजित कदम, पोउपनि देविदास ठमके, पोहवा गजानन तितरेयांनी केली.

# आगामी विधानसभा निवडणुक २०२४ चे अनुशंगाने नागपूर ग्रामीण पोलीसांची प्रतिबंधात्मक कारवाई आणि दारू कारवाई

आगामी विधानसभा निवडणुक २०२४ चे अनुशंगाने निवडणुक दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही निवडणुक प्रक्रीया शांततेत पार पडतील याकरीता मा पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण श्री हर्ष ए. पोद्दार (भापोसे) यांनी जास्तीत प्रतिबंधक कारवाई तसेच अवैध धंदयांवर कारवाई बाबत आदेशीत केले होते.

**प्रतिबंधक कारवाई :–** आगामी विधानसभा निवडणुक २०२४ चे अनुषंगाने दिनांक ०१/०७/२०२४ ते दिनांक २३/१०/२०२४ पावेतो जिल्हयातील रेकॉर्ड वरील आरोपीतांवर खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. **कलम १२६ भा.ना.सु.सं. अन्वये २२३ आरोपींवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. कलम १२९ भा.ना. सु.सं. अन्वये ३१० आरोपींवर, कलम ९३ मपोका अन्वये २६३ आरोपींवर, कलम ५५ मपोका अन्वये ०१ आरोपीवर, कलम ५६ मपोका प्रमाणे ४१ इसमांवर, तसेच एमपीडीए कायदयांतर्गत ०१ आरोपीवर स्थानबद्ध करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.**

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा श्री अनिल म्हस्के , उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर, तथा सहायक पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक स्था.गु.शा आणि स्था.गु.शा पोलीस स्टाफ तसेच सर्व प्रभारी ठाणेदार व त्यांचा स्टाफ यांनी पार पाडली.

**दारूबंदी गुन्हे :–** नागपूर ग्रामीण हद्दीमध्ये विधानसभा निवडणुक प्रक्रीया कालावधीमध्ये कोणताही व्यक्ती अवैधपणे दारू विक्री करणार नाही तसेच यामुळे कुणीही दारू पिवुन सार्वजनिक ठिकाणी उपद्रव होणार नाही.तसेच आदर्श आचारसंहीतेचा भंग होणार नाही याकरीता दि. १५/१०/२०२४ ते २२/१०/२०२४ या दरम्यान नागपूर ग्रामीण पोलीस दलाकडुन अवैध दारूची तस्करी करणाऱ्या इसमां विरूद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा अंतर्गत **एकुण २६७ गुन्हे नोंद झाली असुन इसमांकडुन एकुण ८०४३८.८६० लीटर दारू किंमती १८,५७,४२०/–रू. चा मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला. तसेच सुगंधित तंबाखु, गुटखा पदार्थाची वाहतूक तसेच साठा करणाऱ्या आरोपींविरूद्ध कारवाई करून त्यांचेकडुन २८१.७५० किग्रॅ किंमती १,७८,८००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ मा. श्रीमती वृष्टी जैन, उपविभागिय पोलीस अधिकारी उमरेड, तथा सहायक पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक स्था.गु.शा आणि स्था.गु.शा पोलीस स्टाफ तसेच सर्व प्रभारी ठाणेदार व त्यांचा स्टाफ यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर